# बॅरि शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय खापरखेडा

## मराठी विभाग

प्रा डॉ. अंजली पांडे (जोषी)

विभाग प्रमुख

प्रा. डॉ. संगीता उमाळे

अंषकालीन प्राध्यापक

प्रा. मनोज डोमकी

अंषकालीन प्राध्यापक

बी. ए. भाग 1,2,3आवष्यक मराठी आणि मराठी साहित्य

बी. कॉम भाग 1,2 आवष्यक मराठी

एम. ए. मराठी

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ. अंजली पांडे | एम.ए ,एम.फील., पीएच. डी. | 21 वर्षे 1/7/1997 |
| प्रा. डॉ. संगीता उमाळे | एम.ए, ,एम.फील., पीएच. डी. | 08 वर्षे 1/7/2010 |
| प्रा. मनोज डोमकी | एम.ए , नेट, सेट | 09 वर्षे 1/7/2009 |

बॅरिषेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय खापरखेडा

मराठी विभागस्थापना 1999

अक्षरअर्णव वाङ्मय मंडळ

## Vision of Dept.

- उज्वल भविष्यासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टीकोण निर्माण करणे
- विद्यार्थ्यांच्या अंगी असणा–या सृजनात्मकतेला प्रोत्साहित करणे
- विद्यार्थ्यांमधे सामाजिक जाणीव निर्माण करणे
- विद्यार्थ्यांमधे बुद्धीप्रामाण्यवाद रूजविणे
- कला व साहित्यविषयक अभिरूची निर्माण करणे
- विद्यार्थ्यांच्या ध्येयधोरणांना कार्यान्वित करण्यासाठी कृतीषील करणे
- प्रसार माध्यमांतील लेखनाची उपयोगिता विषद करणे
- विद्यार्थ्यांना उच्चषिक्षणासाठी व स्पर्धात्मक परीक्षांसाठी प्रोत्साहित करणे
- विद्यार्थ्यांना संषोधनासाठी प्रोत्साहित करणे

## Goals and Objects

- लेखन व वाचनविषयक अभिरूची निर्माण करणे
- समाज आणि साहित्याचा अनुबंध स्पष्ट करणे
- विविध कार्यक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहित करणे
- साहित्याच्या विविध प्रकारांची ओळख करून देणे
- कविता वाचन, कथकथन, निबंध लेखन यांसारख्या कार्यक्रमांच आयोजन करणे
- विद्यार्थ्यांच्या अंगी असणा–या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणे
- उपयोजित मराठीचे महत्व प्रतिपादन करणे
- मानवी जीवनातील भाषेचे महत्व प्रतिपादन करणे

## मराठी विभागातर्फे आयोजित कार्यक्रमांचे वैषिष्ट्ये

- ग्रंथदिंडी
- षुद्धलेखन कार्यषाळा
- कवितावाचन
- निबंध लेखन
- कथाकथन
- पाठ्यक्रमावर आधारित व्याख्याने
- पथनाट्य

## वार्षिक अहवाल

# मराठी विभाग सत्र २०१३–१४

प्रा. डॉ. अंजली पांडे
मराठी विभाग प्रमुख
प्रा. संगीता उमाळे
प्रा. मनोज डोमकी
अंशकालीन प्राध्यापक

महाविद्यालयातील मराठी विभागाद्वारे दरवर्षी वैविध्यपूर्ण व अभ्यासात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. मराठी विभागाच्या'अक्षर अर्णव' मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना सत्र १९९८–९९ मध्ये झाली. विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्यविषयक अभिरूची निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून मराठी अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली .या अभ्यास मंडळांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले .

प्राचीन मराठी वाङ्मयात ज्ञानेश्वरीचे अनन्यसाधारण महत्व आहे. पागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातही ती नेमली आहे. सा दृष्टीने 'ज्ञानेश्वरी पठण' या मूल्यात्मक द्विदिवसीय कार्यक्रमाचे आयोजन सौ. काळे व सौ. कोठावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत , प्राचार्य डॉ. टाले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यात मराठी साहित्याच्या विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाचे पठण केले. या सेदर्भत ' ज्ञानेश्वरीतील काव्यसौंदर्स' या विषयावर श्री. घोंगे महारांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली . दुस–या दिवशी सामाजिक समरसतेचे प्रतिक असणारी दिंडी काढण्यात आली होती या सोहळयात विद्यार्थ्यांबरोबरच गांवकरीही सहभागी झाले होते

श्री जानबाजी खंते यांचे ' संत गाडगे महाराजांचे विचारधन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातून मनाच्या आणि परिसराच्या स्वच्छतेचे महत्व प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेला वाव मिळावा विविध साहित्यविषयक कार्यक्रमांचेही आयोजन दरवर्षीप्रमाणे या सत्रातही करण्यात आले

## वार्षिक अहवाल

# मराठी विभाग सत्र २०१४ –१५

प्रा. डॉ. अंजली पांडे
मराठी विभाग प्रमुख
प्रा. संगीता उमाळे
प्रा. मनोज डोमकी
अंशकालीन प्राध्यापक

'अक्षर अर्णव' मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना सत्र १९९८–९९ मध्ये झाली. विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्यविषयक अभिरूची निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून मराठी अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली .या अभ्यास मंडळांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले . 'ज्ञानेश्वरी पठण' हा द्विदिवसीय कार्यक्रम सौ. काळे व सौ. कोठावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत , प्राचार्य डॉ. टाले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला .यात मराठी साहित्याच्या विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वरीचे पठण केले . या कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली . दुस–या दिवशी पालखी सोहळा आयोजिज करण्यात आला होता . या सोहळयात विद्यार्थ्यांबरोबरच गांवकरीही सहभागी झाले होते . पालखी समोरील पाऊल भजनाने महाविद्यालयीन व मंदिर परिसर दुमदुमला .

विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेला वाव मिळावा म्हणून लेखन –वाचन विषयक कार्यक्रमांचेही आयोजन दरवर्षीप्रमाणे या सत्रातही करण्यात आले . विद्यार्थ्यांसाठी 'कविता वाचन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वरचित तसेच अन्य कवी रचित कवितांचे वाचन केले .या कार्यक्रमात मराठी साहित्याचे एकूण तेरा विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच लेखन विषयक अभिरूची वृद्धिंगत व्हावी म्हणून लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती . यात मराठी साहित्याच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडत्या विषयावर लिहिले या लेखनासाठी विषयाचे बंधन नसल्याने विद्यार्थ्यांनी मैत्री , आई , वडील , प्रेम , एखादी आठवण , शेतक–यांची आत्महत्या अशा विविध विषयांवर लेखन केले .

मराठी विभागाच्यावतीने प्रा. विनोद भालेराव यांचे 'मराठीचा भविष्यकाळ' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते . तर

‘मराठीच्या विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी’ या विषयावर प्रा. डॉ. राजेंद्र वाटाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते .

अशा प्रकारे वाङ्मय अभिरूची वाढविण्याचे तसेच विविध वाङ्मय प्रकारांची माहिती करून देण्याचे कार्य महाविद्यालयातील मराठी वाङमय मंडळातर्फे केले जाते .

# मराठी विभाग

सत्र १५—.१६

प्रा. डॉ. अंजली पांडे
मराठी विभाग प्रमुख
प्रा. संगीता उमाळे
प्रा. मनोज डोमकी
अंशकालीन प्राध्यापक

'अक्षर अर्णव' मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना सत्र १९९८—९९ मध्ये झाली. विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्यविषयक अभिरूची निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून मराठी अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली .या अभ्यास मंडळांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. विभागाच्यावतीने 'ज्ञानेश्वरी पठण' हा द्विदिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्राचार्य डॉ. टाले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला .यात मराठी साहित्याच्या विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वरीचे पठण केले . या कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली . दुस—या दिवशी पालखी सोहळा आयोजिज करण्यात आला होता . या सोहळयात विद्यार्थ्यांबरोबरच गांवकरीही सहभागी झाले होते . पालखी समोरील पाऊल भजनाने महाविद्यालयीन व मंदिर परिसर दुमदुमला .

विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेला वाव मिळावा म्हणून लेखन —वाचन विषयक कार्यक्रमांचेही आयोजन दरवर्षीप्रमाणे या सत्रातही करण्यात आले . विद्यार्थ्यांसाठी 'कविता वाचन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वरचित तसेच अन्य कवी रचित कवितांचे वाचन केले .या कार्यक्रमात मराठी साहित्याचे एकूण तेरा विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच लेखन विषयक अभिरूची वृ द्धंगत व्हावी म्हणून लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती . यात मराठी साहित्याच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडत्या विषयावर लिहिले या लेखनासाठी विषयाचे बंधन नसल्याने विद्यार्थ्यांनी मैत्री , आई , वडील , प्रेम , एखादी आठवण , शेतक—यांची आत्महत्या अशा विविध विषयांवर लेखन केले .

मराठी विभागाच्यावतीने डॉ भूषण बंड यांचे 'नवकथेचे स्वरूप' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते . तर 'नवकाव्याचे स्वरूप आणि आकलन ' या विषयावर प्रा. डॉ. राजेंद्र वाटाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते .

अशा प्रकारे वाङ्मय अभिरूची वाढविण्याचे तसेच विविध वाङ्मय प्रकारांची माहिती करून देण्याचे कार्य महाविद्यालयातील मराठी वाङमय मंडळातर्फे केले जाते .

मराठी विभाग२०१६–१७

## वार्षिक अहवालप्रा. डॉ. अंजली पांडे

मराठी विभाग प्रमुख
प्रा. संगीता उमाळे
प्रा. मनोज डोमकी
अंशकालीन प्राध्यापक
सत्र २०१६..१७

'अक्षर अर्णव' मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना सत्र १९९८—९९ मध्ये झाली. विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्यविषयक अभिरूची निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून मराठी अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली .या अभ्यास मंडळांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय खापरखेडा येथे मराठी विभागाच्या वतीने कवी कुसुमाग्रज जयंतीनिमित्य मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.मराठी भाषादिनाचे औचित्य साधून भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टिने 'सगणकावर व महाजालावर मराठीचा वापर' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी टाले यांनी भूषविले. प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयातील संगणक शिक्षक श्री शुभम काकडे व ग्रथपाल डॉ. संगीता चोरे या होत्या. . प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना श्री शुभम काकडे यांनी संगणकाचा वापर ही सद्यस्थितीतील महत्वपूर्ण गरज असून संगणक शिक्षण घेणे प्रत्येकास अनिवार्य असल्याचे सांगितले. डॉ. संगिता चोरे यांनी आजचे युग हे स्पर्धेचं युग असून प्रत्येकालाच संगणक वापरता येणं आवश्यक असल्याच सांगितलं. अध्यक्षस्थानावरून बोलतांना डॉ. टाले यांनी संगणक म्हणजे सर्व गोष्टींची गुरूकिल्ली असल्याचं सांगितले. गुगल, फेसबुक,ट्विटर , ट्विटरवरील ब्लॉग लेख हे परस्परांच्या विचारांच्या आदानप्रदानाचे प्रमुख साधन असल्याचे त्यांनी सांगितले

मराठी भाषादिनाचे औचित्य साधून भाषेच्या संवर्धनाच्या तसेच उद्बोधनाच्या दृष्टिने विद्यार्थ्यांसाठी 'अंधश्रद्धा' व 'स्त्री भृणहत्या' या विषयावर लघुनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी टाले यांनी भूषविले. अध्यक्षस्थानाहून बोलतांना डॉ. टाले यांनी मराठी भाषेच्या अस्तित्वाविषयी उपस्थित केले जाणारे प्रश्न निरर्थक असून जोपर्यत ही भाषा ग्रामीण भागातील लोकव्यवहाराची भाषा आहे, तोपर्यंत असा प्रश्न उपस्थित होणे गैरवाजवी असल्याचे प्रतिपादन केले. गांवखेड्यातील बोलींनी मराठीला समृद्ध आणि श्रीमंत केले असल्याचे डॉ. टाले यांनी सांगितले. यानंतर बी.ए.भाग दोनच्या विद्यार्थिनींनी प्रबोधनपर दोन लघुनाटिका सादर केल्या. 'स्त्री भृणहत्या' या नाटिकेतून विद्यार्थिनींनी 'मुलगी वाचवा' हा संदेश दिला. . 'अंधश्रद्धा' या नाटिकेतून अती अंधश्रद्धा ही पर्यायाने आपल्याच विनाशास कारणीभूत ठरते ही बाब अधोरेखित केली गेली.

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय खापरखेडा येथे १जाने.ते १५ जाने२०१७ या दरम्यान महाराष्ट्र शासन व नागपूर विद्यापीठ निर्देशित ' मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा' मराठी विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. मराठी भाषा संवर्धन पंधरवाडाचे औचित्य साधून भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टिने 'कविता वाचन' 'कथाकथन'आणि व्याख्यान असे मराठी भाषा संवर्धन विषयक विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'मराटी भाषेतील रोजगाराच्या संधी' या विषयावर प्राचार्य डॉ.शरयू तायवाडे व डॉ.

राजेंद्र वाटाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना डॉ.शरयू तायवाडे यांनी सुत्रसंचालन, निवेदन,वृत्त लेखन, भाषांतर, अशा अनेकविध क्षेत्रात मराठी भाषिकांना रोजगाराच्या संधी खुणावत असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. राजेंद्र वाटाणे यांनी पत्रकारितेचं क्षेत्र अतिशय व्यापक असून हे जनसंवादाचं प्रमुख माध्यम असल्याने या क्षेत्रातही रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचं डॉ. वाटाणे यांनी सांगितलं. मराठी भाषा संवर्धन पंधरवाडयानिमित्तानं'कथाकथन' कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. कथेचे आकर्षण आणि आवड बालवयापासूनच असून हा अतिशय लोकप्रिय वांङ्मय प्रकार असल्याचे प्रा. पांडे यांनी सांगितले. प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना डॉ. शेटे यांनी कथा हा अती प्राचीन वांङ्मय प्रकार असून 'कथन करणे' अथवा 'सांगणे' यावरून कथा हे नांव रूढझाल्याचे डॉ. शेटे म्हणाले. ओ हेन्री, रस्किन बॉंड आणि ऑर्थर मिल्लर , मनोहर मालगांवकर अशा भारतीय आणि पाश्चिमात्त्य कथाकारांच्या कथाविश्वाचा ओझरता परिचय करून दिला. डॉ ज्योती सेलूकर यांनी 'ससा आणि कासव' ही कथा आधुनिक संदर्भाच्या अनुषंगाने सांगितली. विद्यार्थीदशेतला असो वा जीवनातला असो स्वल्पविराम हा स्थितीशीलतेच द्योतक असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रंथपाल डॉ. संगीता चोरे यांनी इसापनीतीतील कथा सांगितली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनीही समयोचित कथा सांगितल्या. प्रबोधन आणि मनोरंजन ह्या दोनही बाबी कथेमुळे साध्य होतात असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टाले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितले. विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेला वाव मिळावा म्हणून लेखन –वाचन विषयक कार्यक्रमांचेही आयोजन दरवर्षीप्रमाणे या सत्रातही करण्यात आले . विद्यार्थ्यांसाठी 'कविता वाचन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वरचित तसेच अन्य कवी रचित कवितांचे वाचन केले. 'कविता वाचन' हा कार्यक्रम श्री. बादल कुडवे या माजी विर्द्यार्थ्याच्या प्रमुख उपस्थितीत घंण्यात आला. .

विद्यार्थ्यांना कवितेच्या अभ्यासाच्या दृष्टिने 'काव्य समीक्षा' विषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध कवी प्रसेनजित गायकवाड यांनी कविता कशी अभ्याासावी, कवितेचा आस्वाद कसा घ्यावा या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अशा प्रकारे वाङ्मय अभिरूची वाढविण्याचे तसेच विविध वाङ्मय प्रकारांची माहिती करून देण्याचे कार्य महाविद्यालयातील मराठी वाङमय मंडळातर्फे केले जाते .

# मराठी विभाग

## २०१७ –१८

प्रा. डॉ. अंजली पांडे

मराठी विभाग प्रमुख

प्रा. संगीता उमाळे

प्रा. मनोज डोमकी

अंशकालीन प्राध्यापक

'अक्षर अर्णव' मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना सत्र १९९८–९९ मध्ये झाली. विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्यविषयक अभिरूची निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून मराठी अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली .या अभ्यास मंडळांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले . .

विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेला वाव मिळावा म्हणून लेखन –वाचन विषयक कार्यक्रमांचेही आयोजन दरवर्षीप्रमाणे या सत्रातही करण्यात आले . विद्यार्थ्यांसाठी 'कविता वाचन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वरचित तसेच अन्य कवी रचित कवितांचे वाचन केले . या कार्यक्रमात मराठी साहित्याचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

तसेच वाचन व भाषण विषयक अभिरूची वृद्धिंगत व्हावी म्हणून वाचन व वक्तृत्व कलेवर आधारित 'कथाकथन' कार्यक्रम घेण्यात आला.यात मराठी साहित्याच्या विद्यार्थ्यांनी 'कथाकथन' कार्यक्रमांतर्गत विविध विषयावरील कथा सादर केल्या. या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी उद्‌बोधक व मनोरंजनपर अशा विविध विषयांवर आपल्या कथा सादर केल्या .

मराठी विभागाच्यावतीने 'मराठीतील लोकगीते' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्रीमती मीराबाई निखाडे यांनी काही लोकगीते सादर केली. काही विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमात सहभागी होऊन लोकगीते सादर केली तर प्रतिक्षा चनकापुरे हीने लोकनृत्य प्रकार असणारी लावणी सादर केली.

विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व्यासपीठ मिळवून देणा–या वा विभागातर्फे 'गीतगायन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांनीही गीते सादर केली.

'आजची शिक्षण व्यवस्था : शिक्षकाची भूमिका' या विषयावर प्रा. डॉ. धनराज शेटे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आपल्या व्याख्यानात डॉ. शेट यांनी प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्या परस्पर संबंधांवर प्रकाश टाकून शिक्षणबाह्य हेतू मनात ठेवून निर्माण झालेल्या शिक्षण संस्थां शिक्षणाचा दर्जा कमी करण्यास कारणीभूत ठरतात असे विश्लेषण केले.

कवी कुसुमाग्रजांच्या जयंती निमित्ताने आयोजित करण्यात येणा–या मराठी भाषा दिनाच्या कार्यक्रमात 'मायबोली मराठी' या विषयावर श्री प्रकाश एदलाबादकर, पत्रकार व सहसंपादक, तरूण भारत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते आपल्या व्याख्यानात श्री प्रकाश एदलाबादकर यांनी

कवी कुसुमाग्रजांच्या साहित्याचा थोडक्यात आढावा घेतला. मराठी भाषा ही अतिशय संपन्न, समृध्द आणि श्रीमंत असल्याचं ते म्हणाले.

अशा प्रकारे वाङ्मय अभिरूची वाढविण्याचे तसेच विविध वाङ्मय प्रकारांची माहिती करून देण्याचे कार्य महाविद्यालयातील मराठी वाङमय मंडळातर्फे केले जाते